ePaper

## मराठा आरक्षणासाठी आठवडाभरात सहा जणांची आत्महत्या!



| वर्ष - 7 | अंक - 169 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- श्रीलंकेने इंग्लंडला लोळवले!
- अयोध्येत पोहोचली कंगना रनौत
- चक्रीवादळ 'हामून' बनले धोकादायक!
- गुणरत्न सदावर्ते भाजपाचा माणूस?

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 27 ऑक्टोबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# चाकणमधील 'कोंडी' सुटणार!

## » जिल्हा प्रशासनाकडून उपाययोजना

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**चाकणमधील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेतल्या जाणार आहेत. तळेगाव, आंबेठाण चौकातील महाराष्ट्र शासनाच्या एसटी बसचे थांबे शंभर मीटर पुढे नेले जाणार आहेत. मजूर अड्डा दुसऱ्या ठिकाणी हलविण्यात येणार आहे. येत्या सात दिवसांत अतिक्रमणे काढून टाकण्याचा निर्णय विभागीय आयुक्तांसोबत झालेल्या बैठकीत झाला. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्याची शक्यता आहे.**



औद्योगिक संघटनांच्या पुढाकाराने विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी वाहतूक समस्या सोडविण्यासाठी बैठक घेतली. पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष दीपक करंदीकर, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीचे सचिव दिलीप बटवाल यावेळी उपस्थित होते. यावेळी सात दिवसांत अतिक्रमणे काढणे, रस्त्यावर साचणाऱ्या पाण्याबाबत उपाययोजना करण्याचा निर्णय बैठकीत झाला. तसेच म्हाळुंगेतील पुलाचे स्थापत्य विषयक लेखापरीक्षण, पुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार असल्याचे फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे सचिव दिलीप बटवाल यांनी सांगितले.

### विभागीय आयुक्तांच्या सूचना...



» चाकण परिसर हा अत्यंत वेगाने विकसित होणारा औद्योगिक परिसर आहे. रहिवाशी भागही वाढत आहे. कामगार वर्ग, उद्योजक, साहित्याची वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असलेले अत्यंत वर्दळीचे ठिकाण आहे. चाकणमधील तळेगाव चौक, आंबेठाण चौकातील वाहतूक कोंडी मोठी समस्या बनलेली आहे. वाहनाच्या लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. त्यामुळे उद्योग क्षेत्रातील कामगार वेळेवर कामाच्या ठिकाणी पोहोचू शकत नाहीत. याचा उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी उद्योजकांनी केली होती. त्यानुसार विभागीय आयुक्तांनी बैठक घेत संबंधितांना विविध सूचना दिल्या आहेत.

---

# राजकीय नेत्यांच्या सभा उधळणार!

## » मराठा आंदोलक आक्रमक : मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**मराठा समाजास आरक्षण दिल्याशिवाय मंत्री आमदार, खासदार यांनी पिंपरी चिंचवड शहरात कार्यक्रम घेण्याचे धाडस करू नये. अन्यथा त्यांच्या सभा उधळणार असा इशारा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने साखळी उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी देण्यात आला..**




मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आणि मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पिंपरी चिंचवड शहरात मराठा बांधवांचे साखळी उपोषण सुरू आहे. या उपोषणाचा आज दुसरा दिवस होता. उपोषण स्थळी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मराठा बंधू भगिनींनी व इतर समाजाच्या संस्था संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. आज सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांची उपोषण स्थळी बैठक झाली. यावेळी मराठा समाजास कायमस्वरूपी टिकाऊ आरक्षण दिल्याशिवाय कोणत्याही आमदार, खासदार व मंत्र्यांनी शहरात जाहीर कार्यक्रम घेऊ नये अन्यथा सदर कार्यक्रम मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने संविधानानिक मार्गाने उधळण्यात येईल येईल असा इशारा उपस्थितीतांनी दिला.

यावेळी उपोषण स्थळी कामगार नेते कैलास कदम, कामगार नेते काशिनाथ नखाते, हरीष मोरे, मारुती भापकर, सुभाष साळुंखे, अरूण पवार, गौतम चाबुकस्वार, मनोज गरबडे, राजाभाऊ गोलांडे, विलास भालेकर, कल्पना गिड्डे, विष्णुपंत तांदळे, राजेंद्र कुंजीर, उदयसिंह पाटील आदी मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी अनेक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीस उपस्थित राहून पाठिंबा दिला.

### आंदोलनामध्ये फूट पाडण्याचा सरकारचा इरादा...

» सरकार मराठा समाजाच्या मागणीबाबत टाळाटाळ करत आहे. सदर आंदोलन उधळून लावण्याचा प्रयत्न करत आहे. आंदोलनात फूट पाडण्याचा सरकारचा इरादा आहे. अशा तीव्र स्वरूपाच्या भावना उपस्थितांनी आपल्या मनोगतात व्यक्त केल्या. सतीश काळे, मीराताई कदम, वैभव जाधव, प्रकाश जाधव, मोनल शिंत्रे, संजिवनी पुराणिक, नकुल भोईर, सतिश चांधेरे, अभिषेक म्हसे, काशिनाथ जगताप, संदीप नवसुपे, रावसाहेब गंगाधरे, संतोष शिंदे, सचिन पवार, निलेश बदाले, सिद्धार्थ शिरसाट, गणेश आहेर, मोहन जगताप, पांडुरंग प्रचंडराव आदी कार्यकर्त्यांनी साखळी उपोषण केले

# भूसंपादन रखडण्याचा पालिकेला फटका!

## भूसंपादन रखडल्यामुळे भूसंपादनाच्या खर्चात 294 कोटींनी वाढ

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीची समस्या तीव्र झाली असतानाच येरवडा परिसरातील सात किलोमीटर लांबीच्या रस्ता रुंदीकरणासाठी तब्बल ९१६ कोटी रुपये भूसंपादनासाठी खर्च करावे लागणार आहेत. पंधरा जागा ताब्यात घेण्यासाठी महापालिकेला हा खर्च करावा लागणार असून, भूसंपादन रखडल्यामुळे भूसंपादनाच्या खर्चात २९४ कोटींनी वाढ झाली आहे.**



नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. त्यादृष्टीने महापालिकेने नगर रस्ता परिसराचा एकात्मिक वाहतूक आराखडाही तयार केला असून, समतल विलगक, उड्डाणपूल प्रस्तावित केले आहेत. याशिवाय सेवा रस्ते आणि रस्ता रुंदीकरणाची कामेही प्रस्तावित आहेत. येरवडा ते आपले घर या सात किलोमीटर अंतराचे रस्ता रुंदीकरणही प्रस्तावित आहे. महापालिकेच्या विकास आराखड्यात हा रस्ता दोन्ही बाजूने ६० मीटर रुंदीचा दर्शविण्यात आला आहे. मात्र रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन रखडल्याने महापालिकेवर आर्थिक भुर्दंड पडत असल्याची कबुली महापालिकेकडूनच माहिती अधिकारात देण्यात आली आहे.

विकास आराखड्यातील रस्त्यासाठीचे भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. येरवडा, वडगाव शेरी, लोहगाव या भागात महापालिकेच्या हद्दीत भूसंपादनाची कार्यवाही विशेष अधिकारी यांच्यामार्फत सुरू आहे. प्रारूप निवाडा मंजुरीनंतर ८०२ कोटी ७ लाख ४ हजार ८८८ रुपये रक्कम भरणे प्रलंबित आहे. तसेच वडगाव शेरी, लोहगाव, खराडी, नगर रस्ता सीटीआर कंपनी ते महापालिकेच्या नवीन हद्दीत ६० मीटर रस्ता रुंदीकरणासाठी ११४ कोटी ५६ लाख ८२ हजार ६५५ रुपये रक्कम निवाडा रक्कम भरणे प्रलंबित आहे.

### पालिकेवर आर्थिक भुर्दंड

नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. त्यादृष्टीने महापालिकेने नगर रस्ता परिसराचा एकात्मिक वाहतूक आराखडाही तयार केला असून, समतल विलगक, उड्डाणपूल प्रस्तावित केले आहेत. याशिवाय सेवा रस्ते आणि रस्ता रुंदीकरणाची कामेही प्रस्तावित आहेत. येरवडा ते आपले घर या सात किलोमीटर अंतराचे रस्ता रुंदीकरणही प्रस्तावित आहे. महापालिकेच्या विकास आराखड्यात हा रस्ता दोन्ही बाजूने ६० मीटर रुंदीचा दर्शविण्यात आला आहे. मात्र रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन रखडल्याने महापालिकेवर आर्थिक भुर्दंड पडत असल्याची कबुली महापालिकेकडूनच माहिती अधिकारात देण्यात आली आहे.

रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक भूसंपादनाची प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्याने खर्चातही वाढ झाल्याची वस्तुस्थिती असून रुंदीकरणाअभावी नगर रस्त्यावरील चौकात वाहतूक कोंडी होत आहे.

तसेच सेवा रस्तेही कागदावरच राहिले असून, विमाननगर चौक, इन ऑर्बिट मॉल चौक आणि शास्त्रीनगर येथे वाहतुकीची समस्या निर्माण झाली आहे. दरम्यान, भूसंपादनाची मूळ रक्कम कमी आहे. मात्र प्रतिवर्षी त्या रकमेवर १२ टक्के व्याज द्यावे लागत आहे. त्यामुळे रक्कम वाढली आहे. जसा निधी मंजूर होत आहे त्या पद्धतीने काम सुरू आहे. भूसंपादनाची मूळ रक्कम कमी आहे.

परंतु दरवर्षी त्या रकमेवर १२ टक्के व्याज लागते, त्यामुळे ती वाढली आहे. भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. जसा निधी उपलब्ध होईल, तसे काम सुरू आहे, असा दावा महापालिकेच्या भूसंपादन आणि व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आला आहे.

# अडीच वर्षात ४२ हजार जणांना कुत्र्याचा चावा

## एकाही नागरिकाचा रेबीज होऊन मृत्यू झालेला नाही

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शहरामध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत वाढत आहे. त्याचा फटका महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांसह दुचाकीस्वारांना बसत आहे. गेल्या अडीच वर्षात तब्बल ४२ हजार ६६५ हजार जणांना कुत्र्यांनी चावा घेतला आहे. यामध्ये एकाही नागरिकाचा रेबीज होऊन मृत्यू झालेला नाही, अशी माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे.**



### 52 जणांचा मृत्यू

२०२१ ते ऑगस्ट २०२३ या कालावधीमध्ये पुणे महापालिकेच्या हद्दीत एकाची व्यक्तीचा रेबीजने मृत्यू झालेला नाही. पण महापालिकेच्या हद्दीबाहेर कुत्रा चावल्याने व पुण्यात उपचारासाठी आलेल्या ५२ जणांचा रेबीजने मृत्यू झाला आहे, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.

शहरातील भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात आज महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी आढावा बैठक घेतली. अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे, आरोग्य प्रमुख डॉ. भगवान पवार, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका फुंडे यावेळी उपस्थित होत्या. महापालिकेने २०१८ मध्ये भटक्या कुत्र्यांची गणना केली. त्यामध्ये ३ लाख १५ हजार कुत्र्यांची नोंद झाली होती., तर २०२३ मध्ये केलेल्या गणनेत ही संख्या कमी होऊन १ लाख ७९ हजार ९४० इतकी झाली आहे. महापालिकेने नसबंदी कार्यक्रम व्यवस्थित राबविल्याने कुत्र्यांची वाढ रोखण्यात यश आले आहे असे या अहवालात नमूद केले आहे.

मात्र, शहरातील भटक्या कुत्र्यांचा त्रास कमी झालेला नाही. दिवसा आणि रात्रीच्या वेळी कुत्र्यांचा हल्ला होत असल्याने अनेक जण जखमी झाले आहेत. २०२१ पासून या घटनांमध्ये वाद झाल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. दरम्यान, महापालिका आयुक्तांनी शहरातील भटक्या कुत्र्यांचा आढावा घेत नसबंदी करण्याचे काम आणखी वेगात होणे आवश्यक आहे. त्यासाठी आणखी दोन संस्थांची नियुक्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याची सूचना आजच्या बैठकीमध्ये केली आहे. 10

तसेच जखमी, आजारी कुत्र्यांवर उपचार करण्यासाठीही संस्थांची नियुक्ती केली जाणार आहे. शहरातील पाळीव कुत्र्यांची माहिती एकत्र करुन त्यांना अल्प दरामध्ये लस देण्याची योजना आणणार आहे. त्यामुळे कुत्र्यांपासून होणाऱ्या रेबीज रोगावर नियंत्रण आणणे शक्य होईल.

# कॅबचालकांनी बंद करताच आरटीओ ॲक्शन मोडवर!

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

ओला, उबर कंपन्यांच्या विरोधात रिक्षा आणि कॅब संघटनांनी अनेक तक्रारी केल्या आहेत. या कंपन्यांवर कारवाईची मागणीही त्यांनी केली आहे. त्यामुळे ओला आणि उबर या कंपन्यांच्या प्रतिनिधींसोबत लवकरच बैठक घेतली जाणार आहे. या बैठकीत कंपन्यांची बाजू जाणून घेतली जाणार आहे, अशी माहिती प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी बुधवारी दिली.

ओला आणि उबरविरोधात प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर (आरटीओ) बुधवारी रिक्षा व कॅब चालक-मालक यांनी निदर्शने केली. महाराष्ट्र रिक्षा पंचायत, ऑटो टॅक्सी बस ट्रान्सपोर्ट फेडरेशन, ऑटो रिक्षा चालक-मालक संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्र राज्य, पुणे रिक्षा फेडरेशन, ऑटो जनता गॅरेज फोरम या संघटनांच्या वतीने बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

या वेळी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन दिले. यावर प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी ओला, उबर या कंपन्यांसह रिक्षा व कॅब संघटनांची बैठक घेण्याची निर्णय घेतला आहे. याबाबत कांबळे म्हणाले, की रिक्षाचालक-मालकांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करावे, मुक्त रिक्षा परवाना बंद करावा, इलेक्ट्रिक रिक्षांना परमिट सक्ती करावी अशा आमच्या मागण्या आहेत.

ओला, उबर या कंपन्यांकडून टॅक्सी व रिक्षा चालक-मालकांची आर्थिक फसवणूक सुरू असून, त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. या कंपन्यांनी चारचाकी वाहनांचे दर वाढवावेत, अशीही मागणी आम्ही केली आहे.

# ‘वेस्ट टू एनर्जी’तून 12 मेगावॅट वीजनिर्मिती!

## आमदार महेश लांडगे यांचा ड्रीम प्रोजेक्ट : पर्यावरण संवर्धनासह वीज बचतीला चालना

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रतिदिन ७०० टन क्षमतेच्या प्रकल्पामधून १२ मेगावॅट वीजनिर्मिती होत असून येत्या काही दिवसांत हा प्रकल्प पुर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहे. त्यातून १४ मेगावॅट वीजनिर्मिती केली जाईल, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावणे तसेच पर्यावरणविषयक समस्यांचे निराकरण करणे हा उद्देश या प्रकल्पाच्या माध्यमातून साध्य होत असून महापालिकेच्या खर्चातही बचत करणारा हा प्रकल्प ठरत आहे, असेही आयुक्त शेखर सिंह म्हणाले.**



पिंपरी चिंचवड शहरात निर्माण होणाऱ्या दैनंदिन सुमारे १ हजार १५० मेट्रिक टन कचऱ्यावर मोशी येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पामध्ये प्रक्रिया केली जाते. त्यातील ७०० मेट्रिक टन कचऱ्यापासून १४ मेगावॅट वीजनिर्मिती करणे हे वेस्ट टू एनर्जी म्हणजेच कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. हा प्रकल्प डीबीओटी तत्वावर पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप नुसार विकसित केला गेला असून त्यांच्यामार्फत २१ वर्षे कालावधीसाठी चालवला जाणार आहे. घनकचरा व्यवस्थापन विनियम २०१६ चे पालन करून या प्रकल्पाची उभारणी करण्यात आली असून कार्बन उत्सर्जनावर लक्ष ठेवण्यासाठी कार्बन उत्सर्जन निरिक्षण कार्यप्रणालीचा यामध्ये वापर करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे दरवर्षी सुमारे ७ लाख टन कार्बन उत्सर्जन रोखले जाणार आहे.

कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प चालविण्यासाठी सुमारे २ मेगावॅट वीज लागत असून उर्वरित वीज ओपन ऍक्सेस पद्धतीने महापालिकेच्या वॉटर ट्रीटमेंट प्लॅन्ट आणि मैलाशुद्धीकरण केंद्रांसाठी वापरण्यात येत आहे. हा प्रकल्प शहरामध्ये गोळा होणाऱ्या कचऱ्याच्या गुणधर्मांचा विचार करून तयार करण्यात आला असून त्यामध्ये कचऱ्याचे पुर्ण क्षमतेने ज्वलन व्हावे यासाठी मुव्हींग ग्रेटचा वापर करण्यात आलेला आहे. कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्पाबाबत बोलताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, या प्रकल्पाच्या आधारे केवळ कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली जात नाही तर यामुळे महापालिकेच्या वीज बिलामध्येही भरीव बचत होत आहे. हा प्रकल्प भारत सरकारची ग्रीन ओपन ऍक्सेस पॉलिसीही सरेखित करतो. शहराला नाविन्यपूर्ण बाबींमध्ये पुढे घेऊन जाण्याचा महापालिकेचा निर्धार आहे.



“ कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्पासाठी चिखली येथील मैलाशुद्धीकरण केंद्रामध्ये प्रक्रिया केलेल्या ५ एम.एल.डी पाण्याचा वापर करण्यात येत असल्याने पिण्याच्या पाण्याची बचतही होत आहे. महापालिकेचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प कार्यान्वित झाला असून यामुळे कचरा डंपिंगसाठी अधिकच्या जागेची गरज भासत नाही. शिवाय महापालिकेच्या वीज बिलातही बचत होत आहे. व्हीजन- २०२० अंतर्गत हा प्रकल्प आम्ही हाती घेतला होता.

**- महेश लांडगे,**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.



---

# मोशी-चऱ्होली ९० मीटर रस्त्याच्या कामाला ‘अल्टिमेटम’!

## आ. महेश लांडगे यांची ‘ऑनफिल्ड’ पाहणी : सहा महिन्यांत रस्त्याचे काम पूर्ण करण्याची सूचना

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराची पुणे आणि सभोवतालच्या औद्योगिक पट्टयातील ‘कनेक्टिव्हीटी’ वाढवण्याच्या दृष्टीने प्रमुख ‘धमनी’ म्हणून विकसित होणारा मोशी-चऱ्होली ९० मीटर रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. या ९ हजार ५६३ मीटर रस्त्यापैकी ७ हजार ८०३ मीटर रस्ता विकसित केला आहे. उर्वरित सुमारे दोन किमी रस्त्याच्या काम आगामी ६ महिन्यात पूर्ण करावे, अशी सूचना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



मोशी ते चऱ्होली ९० मीटर रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत मोशीतील जयगणेश साम्राज्य चौकातून सुरू होणारा हा रस्ता प्राईड सिटी, चऱ्होली येथे संपतो. पहिल्या टप्प्यात ९ हजार ५६३ मीटरपैकी ७ हजार ८०३ मीटर रस्ता विकसित झाला आहे. उर्वरित सुमारे २ किमी रस्त्याचे भूसंपादन, शेतकऱ्यांचे प्रश्न, अ-ब पत्र, टीडीआर या तांत्रिक अडचणींबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्यासोबत आमदार महेश लांडगे यांनी ‘ऑनफिल्ड’ पाहणी आणि चर्चा केली.

यावेळी माजी महापौर नितीन काळजे, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, नगररचना विभागाचे सहसंचालक संदेश खडतरे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### आयुक्त घेणार आढावा...

‘‘मोशी-चऱ्होली-चिखली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर’’ झपाट्याने विकसित होत आहे. आगामी सहा महिन्यांमध्ये या रस्त्याचे काम पूर्ण करण्याची सूचना प्रशासनाला केली आहे. चऱ्होली, प्राईड सिटी आणि परिसराची ‘कनेक्टिव्हीटी’ वाढवणे आणि पिंपरी-चिंचवडमधून पुणे- सोलापूर महामार्ग, पुणे-नगर महामार्गाला जाण्यासाठी हा महामार्ग महत्त्वपूर्ण ठरणार आहे. पुणे महापालिका हद्दीतून वाघोली ते चऱ्होलीपर्यंत या रस्त्याचे काम सुरू झाले आहे. त्यामुळे हा रस्ता आगामी काळात चऱ्होलीसह पिंपरी-चिंचवडची वाहतूक सक्षम करणारी प्रमुख ‘धमनी’ ठरणार आहे. महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे या कामासाठी किमान १५ दिवसांतून एकदा आणि आयुक्त शेखर सिंह महिन्यातून एकदा आढावा बैठक घेणार आहेत.

**“ पिंपरी-चिंचवड शहरातून नगर महामार्ग, सोलापूर महामार्गाकडे जाण्यासाठी मोशी-चऱ्होली ९० मीटर रस्ता ‘सुपरफास्ट’ ठरणार आहे. यासह ‘चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर’ झपाट्याने विकसित होत असून, या भागातील नागरिकांना पुणे, पिंपरी-चिंचवड, लोहगाव विमानतळ आणि औद्योगिक पट्ट्यातील ‘कनेक्टिव्हीटी’ सक्षम होण्यास मदत होईल. पुणे महापालिका हद्दीतील रस्त्याचे काम सुरू झाले आहे. पिंपरी-चिंचवड हद्दीतील रस्ता आगामी ६ महिन्यांत विकसित व्हावा, अशी अपेक्षा आहे.**

**महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# शरीफ, भारत नि ‘उम्मीदएशराफत’!




**पाकिस्तानच्या पंतप्रधानपदी सर्वाधिक काळ राहिलेल्या नवाझ शरीफ यांची ‘पाकिस्तान वापसी’ जगभरातील अनेक संघर्षांच्या कल्लोळात फारशी लक्षात आली नाही. पण पाकिस्तानातील या जुन्या-जाणत्या नेत्याचे पुन्हा पाकिस्तानात परतणे आणि राजकारणात सक्रिय होणे हे भारतासाठी निश्चितच दखलपात्र ठरते.**



पाकिस्तानमध्ये पुढील वर्षाच्या सुरुवातीस सार्वत्रिक निवडणुका आहेत. त्यामध्ये इम्रान खान यांच्या पाकिस्तान तेहरीक-इ-इन्साफ (पीटीआय) पक्षासमोर आव्हान उभे करण्यासाठी शरीफमियाँना पाकिस्तानी लष्करानेच पुन्हा त्या देशात येऊ दिले आहे, असे काही विश्लेषक सांगतात.

सन २०१८ मध्ये शरीफ यांच्या पाकिस्तान मुस्लीम लीग (नवाझ) पक्षाच्या विरोधात इम्रान खान यांना निवडणुकीच्या माध्यमातून सत्तेवर ‘बसवले’. परंतु पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात उत्तरार्धात इम्रान हेच पाकिस्तानी लष्कराला डोईजड होऊ लागले. पाकिस्तानी लष्करावर राजकीय हस्तक्षेपाचा थेट आरोप करणे किंवा लष्करी आस्थापनांवर कार्यकर्त्यांनी चालून जाणे असले प्रकार इम्रान यांचे पूर्वसुरी करू धजले नव्हते. त्यामुळे विद्यामान लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी पाकिस्तानातील दोन प्रमुख राजकीय पक्ष – पीएमएल (एन) आणि पाकिस्तान पीपल्स पार्टी (पीपीपी) यांना हाताशी धरून कायदेमंडळामध्ये, तसेच विविध खटल्यांच्या आधारे न्याययंत्रणेमार्फत इम्रान यांची कोंडी केली. इम्रान खान आगामी निवडणूक लढवण्याची शक्यता जवळपास नाही. तरी त्यांचे आणि त्यांच्या पक्षाचे उपद्रवमूल्य जराही कमी झालेले नाही. त्यामुळेच पाकिस्तानच्या पंतप्रधानपदावर तीन वेगवेगळ्या कार्यकाळांमध्ये मिळून नऊ वर्षे राहिलेले नवाझ शरीफ यांच्यासाठी पायघड्या अंथरल्या जात आहेत. अर्थात पाकिस्तानी लष्कराची धारणा काहीही असली, तरी शरीफ यांचे पाकिस्तानच्या राजकारणात पुन्हा सक्रिय होणे हे भारतासाठी महत्त्वाचे ठरते. याचे एक कारण म्हणजे नवाझ शरीफ हे अलीकडच्या काळातील सर्व भारतीय पंतप्रधानांना भेटलेले आहेत.

त्यातही अटलबिहारी वाजपेयी आणि नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या भेटीगाठी अधिक लक्षणीय ठरल्या होत्या. २०१५ मध्ये रशियातील युफा परिषदेच्या निमित्ताने दोन नेत्यांच्या वतीने प्रसृत झालेल्या संयुक्त जाहीरनाम्यात काश्मीरचा उल्लेख टाळण्यात आला होता. तत्पूर्वी २०१४ मध्ये मोदींच्या शपथविधी सोहळ्यास नवाझ शरीफ तेथील लष्कराचा विरोध झुगारून उपस्थित राहिले होते. तीन वेळा तीन वेगवेगळ्या सत्ताकेंद्रांकडून शरीफ यांना पदच्युत करण्यात आले होते. यातील दुसऱ्या खेपेस तत्कालीन लष्करप्रमुख परवेझ मुशर्रफ यांनी त्यांचे सरकार उलथून टाकले, त्या वेळी कारगिल संघर्षात भारतासमोर नमते घेतल्याचा आणि त्या संघर्षाची जबाबदारी पाकिस्तानी लष्करावर ढकलल्याचा आरोप त्यांच्यावर झाला होता. पण फेब्रुवारीमध्ये बसयात्रा आणि पुढे जून-जुलैमध्ये कारगिलमध्ये घुसखोरी हा धोरणात्मक विरोधाभास शरीफ यांना अमान्य होता हेही कारण होते. भारताबरोबर काश्मीरसह सर्व मुद्द्यांवर चर्चा करण्याची तयारी ठेवलेले ते दुर्मीळ पाकिस्तानी नेते ठरतात. त्यामुळे पाकिस्तानशी चर्चेची शक्यता शरीफ यांच्या परतण्यामुळे बळावली आहे. अर्थात यासाठी भारताने ठेवलेली काश्मीर खोऱ्यात दहशतवादास खतपाणी आणि घुसखोरी समाप्तीची अट शरीफ यांच्या पाकिस्तानला प्रथम मान्य करावी लागेल. पाकिस्तानी लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर आज त्यांचे स्वागत करतील. पण हा दोस्ताना किती दिवस टिकून राहील, यावर बरेच काही अवलंबून आहे. कारण भारताशी चर्चा करण्याविषयी आग्रही राहणारे शरीफमियाँ भ्रष्टाचारातही अव्वल नंबरी आहेत! त्यामुळेच त्यांच्यावर जेव्हा-जेव्हा कारवाई झाली, त्या वेळी फारच थोड्यांनी सहानुभूती, कणव वगैरे व्यक्त केली होती. पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या कार्यकाळात त्यांनी पाकिस्तानी अर्थव्यवस्थेला रुळांवर आणण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले, परंतु स्वत:, स्वत:चे कुटुंबीय आणि स्वत:च्याच नावे असलेल्या पक्षातील सदस्यांच्या नावे बेहिशेबी संपत्ती देशात आणि परदेशात उभी करण्याची त्यांची सवय अलीकडेपर्यंत सुटलेली नव्हती.

## संपादकीय »

# बाबू ते बाबूराव!

***हल्ली सहकारी राजकारण्यांपेक्षा हाताखालील अधिकाऱ्यांमार्फत राजकारण करण्याकडे आणि प्रशासन चालवण्याकडे कल मोठ्या प्रमाणावर वाढू लागलेला आहे.***

किरण बेदी, सत्यपाल सिंग, व्ही. के. सिंग, न्या. रंजन गोगोई, हरदीपसिंग पुरी, अश्विनी वैष्णव, एम. एस. गिल, विजय कुमार सिंग, अरविंद कुमार शर्मा, चंद्रमोहन मीना, ओ. पी. चौधरी, श्रीनिवास पाटील, नीलकांत टेकम आणि आता व्ही. के. पांडियन... ही सर्व विविध पदांवर सरकारी सेवेत काम केलेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत, हे लक्षात आलेच असेल. हे सर्व सक्रिय राजकारणात आहेत वा होते. पण सर्वच असे नाहीत. उदाहरणार्थ टेकम वा पांडियन. आपल्या पदाचा राजीनामा देऊन हे टेकम थेट निवडणुकीच्या मैदानात उतरले. त्याआधी अर्थातच ते भाजपत सामील झाले. हा त्यांच्या पक्षप्रवेशाचा सोहळा राजकारणी प्रतिस्पर्ध्यास लाजवेल असा होता. काही हजार जणांची मिरवणूक, मोटारसायकल्स आणि मोटारींचा जामानिमा त्यांच्या या राजकीय प्रवेशाच्या साजरीकरणासाठी तयार होता. सध्या छत्तीसगड विधानसभा निवडणुकांत भाजपने त्यांस उतरवले आहे.

**नरेंद्र मोदींच्या वादळात दिशा भरकटलेल्या काँग्रेसने गेल्या वर्षी २६ ऑक्टोबर २०२२ रोजी दक्षिण भारतातील दलित समाजातून आलेल्या, ५० वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय, सामाजिक, प्रशासकीय कामकाजाचा अनुभव असणाऱ्या स्वच्छ प्रतिमेच्या मल्लिकार्जुन खरगे यांना गांधी कुटुंबाबाहेरचे अध्यक्ष म्हणून निवडले. पराभूत मानसिकतेत असणाऱ्या या पक्षाला खरगे यांनी सर्वसमावेशक नेतृत्व आणि कौशल्याच्या बळावर विश्वास गेल्या वर्षभरात दिला.**

# खरगेंनी काँग्रेसला नवा सूर मिळवून दिला

योग्य समन्वय, संवाद आणि अनुभवाच्या बळावर त्यांनी कर्नाटकात भाजपचा पराभव करून गोंधळलेल्या काँग्रेसला सूर मिळवून दिला. काँग्रेस पक्ष मोदी-शाह यांना टक्कर देऊ शकतो, ही उमेद दिली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या गांधी-नेहरूंच्या १३८ वर्षीय काँग्रेसला नामशेष करण्याच्या आरोळ्या पंतप्रधानदेखील प्रचारसभांतून देत असताना, खरगेंनी दक्षिण भारतातल्या एकमेव राज्यातून भाजपला मुक्त केले आणि काँग्रेस जिवंत राहील हे कृतीतून दाखवून दिले.

अनेकवेळा अनेकांनी काँग्रेसवर गांधी कुटुंबाच्या घराणेशाहीचा आरोप केला आहे. मात्र गेल्या दशकभरात, भाजपच्या आरोपांनी काँग्रेस पहिल्यांदाच कधी नव्हे एवढी घायाळ झाली. विशेषत: २०१९ नंतर मोदी-शहांच्या आक्रमक राजकारणामुळे विरोधी पक्षांची अवस्था केविलवाणी झाली.



मोदींनी भल्याबुऱ्या पद्धतीने सत्ता राबवून अन्य पक्षीयांना जेरीस आणले. अनेकांना तुरुंगात पाठवले, अनेकांची संपत्ती गोठवली, तपासयंत्रणांकडून नोटिसा धाडल्या, धाडी घातल्या, अनेक राज्यांतील सरकारे पाडून भाजपला त्या त्या राज्यात सत्ता मिळवून दिली. अनेकांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले.

याचा सर्वाधिक परिणाम काँग्रेसवर झाला. काँग्रेसमधील अनेक ‘धनवान’ नेतेमंडळी भाजपच्या ‘वॉशिंग मशीन’मधून पवित्र होण्याची धडपड करू लागली होती. ज्योतिरादित्य सिंदिया, हेमंत बिस्वा सरमा, जगदम्बिका पाल, चौधरी बिरेंद्र सिंह, एस. एम. कृष्णा यांच्यासारखे कधीकाळचे काँग्रेसनिष्ठ पक्षनेतृत्वावर आरोप करून भाजपत गेले. काही नेते जी-२३ सारखा गट तयार करत होते. पक्षाला लोकसभेत, विविध राज्यांच्या विधानसभेत यश मिळत नव्हते. अशा संकटकाळात काँग्रेसला तारण्याचे मोठे शिवधनुष्य काँग्रेसच्या नऊ हजार ५४८ मतदारांपैकी सात हजार ८९७ मतदारांनी, काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी खरगेंच्या खांद्यावर दिले. खरगेंनीही वर्षभरात आपल्या सर्वसमावेशक नेतृत्वकौशल्याने काँग्रेसला कूस बदलण्यास भाग पाडले आहे. खरगे पक्षाध्यक्ष झाल्यानंतरच भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या गृहराज्यात हिमाचल प्रदेशात प्रियंका गांधी आणि खरगेंच्या मेहनतीने राज्याला काँग्रेसचा मुख्यमंत्री मिळाला. खरगेंनी स्वतःच्या गृहराज्यात, कर्नाटकात भाजपचा दारुण पराभव केला. काँग्रेस गटबाजीने पोखरली आहे, ही चर्चा शिखरावर असताना कर्नाटकातील डी. के. शिवकुमार आणि सिद्धरमय्या यांच्यात खरगेंनी योग्य समन्वय केला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मुख्यमंत्र्यांची घोटाळेबाजांच्या घरी भेट

## » मनीषा कायंदे यावर काही बोलाल का : जितेंद्र आव्हाड

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**सध्या अंमली पदार्थ तस्करी प्रकरण चांगलंच गाजत आहे. यावरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षाकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. अलीकडेच शिंदे गटाच्या प्रवक्त्या मनीषा कायंदे यांनी पत्रकार परिषद घेत राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर गंभीर आरोप केले.**

जितेंद्र आव्हाडांचा संशयित ड्रग्स तस्करांशी संबंध असल्याचा मोठा दावा मनीषा कायंदे यांनी केला. तसेच, विविध संशयित ड्रग्स तस्करांसोबत असलेले आव्हाडांचे फोटोही त्यांनी प्रसारमाध्यमांना दाखवले. यानंतर आता जितेंद्र आव्हाड यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. मुख्यमंत्री शिंदे हे पाच दिवसांपूर्वी जुगारी आणि घोटाळेबाजांच्या घरी गेले होते, असा दावाही त्यांनी केला आहे. तसेच संबंधित प्रकरणावर शिंदे गटाच्या प्रवक्त्या मनीषा कायंदे यांनी बोलावं, अशी मागणीही आव्हाडांनी केली. 'एक्स'वर (पूर्वीचे ट्विटर) लिहिलेल्या पोस्टमध्ये जितेंद्र आव्हाड म्हणाले, "मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाच दिवसांपूर्वी गृहनिर्माण घोटाळ्यातील जुगारी व घोटाळेबाज आणि छोटा राजनचा जवळचा सहकारी पराग संघवीच्या घरी भेट दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पराग संघवी यांच्या निवासस्थानी भेट देतानाचे हे फोटो आहेत. मनीषा कायंदे कृपया तुम्ही यावर काही बोलाल का?" मनीषा कायंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन जितेंद्र आव्हाडांचा संशयित ड्रग्स तस्करांशी संबंध असल्याचा मोठा दावा केला होता. विविध संशयित ड्रग्स तस्करांसोबत असलेले आव्हाडांचे फोटोही माध्यमांना दाखवले. तसेच त्यांनी सुप्रिया सुळे यांच्यावरही टीका केली. शानू पठाण, सलमान फाळके या ड्रग्स प्रकरणातील संशयित आरोपींची जितेंद्र आव्हाड आणि सुप्रिया सुळेंचा संबंध असल्याचा दावा त्यांनी केला होता.



### शिंदे यांचे फोटो सोशल मीडियावर

» संशयित ड्रग्स तस्करांशी संबंध असल्याचा मोठा दावा मनीषा कायंदे यांनी केला. तसेच, विविध संशयित ड्रग्स तस्करांसोबत असलेले आव्हाडांचे फोटोही त्यांनी प्रसारमाध्यमांना दाखवले. यानंतर आता जितेंद्र आव्हाड यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. मुख्यमंत्री शिंदे हे पाच दिवसांपूर्वी जुगारी आणि घोटाळेबाजांच्या घरी गेले होते, असा दावाही त्यांनी केला आहे. तसेच संबंधित प्रकरणावर शिंदे गटाच्या प्रवक्त्या मनीषा कायंदे यांनी बोलावं, अशी मागणीही आव्हाडांनी केली. जितेंद्र आव्हाड म्हणाले, "मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाच दिवसांपूर्वी गृहनिर्माण घोटाळ्यातील जुगारी व घोटाळेबाज आणि छोटा राजनचा जवळचा सहकारी पराग संघवीच्या घरी भेट दिली.



### आव्हाडांनी काय केलंय ट्विट?

» जितेंद्र आव्हाड यांनी ट्विट केलं आहे. यामध्ये ते म्हणतात, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घरकुल घोटाळ्यातील घोटाळेबाज आणि जुगारी पराग सिंघवी याच्या घरी पाच दिवसांपूर्वी भेट दिली. हा पराग संघवी अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनचा जवळचा सहकारी आहे. (Latest Marathi News) या भेटीचे काही फोटोही त्यांनी पोस्ट केले आहेत. या फोटोंमध्ये मुख्यमंत्री संबंधित आरोपीशी चर्चा करताना दिसत आहेत.

### नव्या आरोपांना तोंड फुटणार

» दरम्यान, शिवसेनेच्या विधानपरिषदेच्या आमदार आणि प्रवक्त्या मनिषा कायंदे यांना आवाहन केलं की, त्यांनी याविषयावर बोलावं. त्यामुळं आव्हाडांच्या या नव्या आरोपांमुळं आता नव्या राजकीय वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

---

# मजुरांसाठीची भोजन योजना गुंडाळली!

## » 1 नोव्हेंबरपासून काम थांबविण्याचा आदेश

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बांधकाम मजुरांना दोन वेळचे भोजन देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली मात्र कालांतराने भ्रष्टाचाराचे कुरण असल्याच्या आरोपामुळे वादग्रस्त ठरलेली माध्यान्ह भोजन योजना अखेर गुंडाळण्यात आली आहे.**



राज्याच्या कामगार विभागाने संबंधित ठेकेदारांना १ नोव्हेंबरपासून काम थांबविण्याचे आदेश दिले आहेत. अत्यंत वादग्रस्त ठरलेल्या या योजनेमध्ये गेल्या चार वर्षांत बोगस कामगार दाखवून ठेकेदारांनी हजारो कोटी लांबविल्याची बाब 'लोकसत्ता'ने उघडीस आणली होती. गेल्या वर्षभरातच योजनेआडून अडीच ते तीन हजार कोटींचा ताव मारल्याचे स्पष्ट झाले होते. हा मुद्दा विधिमंडळात उपस्थित झाल्यानंतर सरकारने चौकशीचे आदेश दिले होते. त्यानंतर आता ही योजना गुंडाळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इमारत व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाला उपकाराच्या माध्यमातून हजारो कोटींचा निधी मिळतो. हा निधी मजुरांच्या कल्याणासाठी खर्च करणे अपेक्षित असते. याचा भाग म्हणून कामगारांना दोन वेळचे सकस भोजन देणारी योजना राबविण्याचा निर्णय फेब्रुवारी २०१९ मध्ये घेण्यात आला.

चपाती, भाजी, डाळ, भात, लोणचे, सलाड आणि गूळ अशी थाळी एक रुपयात देणारी ही योजना होती. त्यासाठी मुंबई, नवी मुंबई, औरंगाबाद विभागासाठी 'मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि.', नाशिक व कोकण विभागांसाठी (मुंबई व नवी मुंबई वगळून) 'मे. इंडोअलाईड प्रोटीन फुड्स प्रा. लि.', तर पुणे, अमरावती आणि नागपूर विभागासाठी 'मे. पारसमल पगारिया अँड कंपनी' यांना कंत्राट देण्यात आले होते. सुरुवातीला केवळ नोंदणीकृत कामगारांसाठी असलेली ही योजना करोनाकाळात बिगर नोंदणीकृत, तसेच नाका कामगारांसाठीही खुली करण्यात आली. मात्र विकासक, कामगार ठेकेदार आणि माध्यान्ह भोजन पुरवठादारांनी कामगार विभागातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून निधीवर ताव मारल्याचे उघड झाले होते.

---

# गुणरत्न सदावर्ते भाजपाचा माणूस?-दानवे

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

मराठा समाजाला आरक्षण मिळूच देणार नाही, अशी भूमिका सदावर्ते यांनी घेतली आहे. यानंतर गुरुवारी सकाळी काही मराठा आंदोलकांनी गुणरत्न सदावर्ते यांच्या कारची तोडफोड केली आहे. या सर्व घडामोडींनंतर गुणरत्न सदावर्ते हा भाजपाचा माणूस असून ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे निकटवर्तीय असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. यावर आता केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

गुणरत्न सदावर्ते हे कोण आहेत? हे सर्वांना माहीत आहेत. त्यांचा भाजपाशी कसलाही संबंध नाही, अशी प्रतिक्रिया दानवे यांनी दिली. गुणरत्न सदावर्तेंचा एकेरी उल्लेख करत रावसाहेब दानवे म्हणाले, "हे पाहा, गुणरत्न सदावर्ते कोण आहे? हे सर्वांना माहीत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला दिलेलं आरक्षण उच्च न्यायालयात टिकवलं होतं. त्याला आव्हान देणारा हा माणूस आहे.

मागील काही दिवसांपासून राज्यात मराठा आरक्षणावरून राजकीय वातावरण तापलं आहे. ठरलेल्या वेळेत सरकारने आरक्षण न दिल्याने मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

पुन्हा एकदा उपोषणाला सुरुवात केली आहे. दरम्यान, वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मराठा आरक्षणाला विरोध केला आहे.

# प्रियांका गांधींना नोटीस!

## » पंतप्रधान मोदींवरील टीका भोवणार?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**प्रियांका गांधींना पंतप्रधान मोदींवरील (PM MODI) टीका भोवणार का, अशी चर्चा सुरू झाली आहे. राजस्थानमधील एका प्रचार सभेत बोलताना प्रियांका गांधी-वाड्रा यांनी पंतप्रधान मोदींवर टीका केली होती. ही टीका आचार संहितेचे उल्लंघन असल्याचा आरोप करत भाजपने निवडणूक आयोगाकडे तक्रार केली. त्यानंतर आयोगाने प्रियांकांना नोटीस बजावली आहे.**

निवडणूक आयोगाने गुरुवारी (२६ ऑक्टोबर) काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी यांना नोटीस पाठवून उत्तर मागितले आहे. आयोगाने प्रियांका गांधी यांना 30 ऑक्टोबरच्या संध्याकाळपर्यंत नोटीसला उत्तर देण्यास सांगितले आहे. प्रियांका गांधी राजस्थानच्या दौसामधील सभेत बोलताना म्हटल्या की, जेव्हा पंतप्रधान मोदींनी मंदिराला दिलेल्या देणगीचा लिफाफा उघडला तेव्हा त्यात फक्त 21 रुपये आढळले. याबाबत भाजपने प्रियांका गांधी यांच्याविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. भाजपने प्रियांका गांधींच्या भाषणाचा व्हिडिओही त्यात समाविष्ट करण्यात आला होता. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल म्हणाले होते की, "आम्ही निवडणूक आयोगाला सांगितले होते की, 20 ऑक्टोबर रोजी काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी भाषणादरम्यान विधान करून आचारसंहितेचे उल्लंघन केले आहे." प्रियांका गांधी यांनी आचारसंहितेचे पालन केले का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तुम्ही संहितेच्यावर आहात का? तुम्ही खोटे पसरवू शकत नाही. धार्मिक भावनांचा प्रचारही करता येत नाही, असेही मेघवाल यांनी म्हटले. प्रियंका गांधी म्हणाल्या होत्या, तुम्ही ते पाहिलंच असेल. मी



ते टीव्हीवर पाहिले आहे, ते खरे आहे की नाही हे माहित नाही. पीएम मोदी बहुधा देवनारायणजींच्या मंदिरात गेले असावेत. त्यांनी दानपेटीत लिफाफा घातला. मी टीव्हीवर पाहिले की, 6 महिन्यांनंतर, जेव्हा मी पंतप्रधान मोदींनी दान केलेला लिफाफा उघडला तेव्हा त्यात 21 रुपये सापडले. एका प्रकारे हेच होत असल्याचे प्रियांकांनी म्हटले. मंचावर उभे राहून देशात घोषणा देताना अनेक लिफाफे दाखवले जात आहेत. जेव्हा तुम्ही लिलाफे उघडता तेव्हा निवडणूक संपलेली असते. राजस्थानच्या 200 जागांसाठी 25 नोव्हेंबरला मतदान होणार आहे आणि त्याचा निकाल 3 डिसेंबरला लागेल. सध्या राज्यात अशोक गेहलोत यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे सरकार आहे. भाजपकडून राज्यात काँग्रेसला आव्हान दिले जात आहे.

### भाजपने काय तक्रार केली?

» केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल म्हणाले होते की, "आम्ही निवडणूक आयोगाला सांगितले होते की, 20 ऑक्टोबर रोजी काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी भाषणादरम्यान विधान करून आचारसंहितेचे उल्लंघन केले आहे." प्रियांका गांधी यांनी आचारसंहितेचे पालन केले का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तुम्ही संहितेच्यावर आहात का? तुम्ही खोटे पसरवू शकत नाही. धार्मिक भावनांचा प्रचारही करता येत नाही, असेही मेघवाल यांनी म्हटले.

### राजस्थानात केलं भाषण

» भाजपनं यासंदर्भात निवडणूक आयोगाकडं तक्रार दिली आहे. या तक्रारीत भाजपनं म्हटलं की, २० ऑक्टोबर रोजी राजस्थानातील दौसा इथं एका सभेला संबोधित करताना प्रियंका गांधी यांनी सांगितलं की, त्यांनी टिव्हीवर पाहिलं की मोदींनी एका मंदिराला दिलेल्या देणगीचा लिफाफा उघडण्यात आला तेव्हा त्यामध्ये फक्त २१ रुपयांचं दान होतं.

### आचारसंहितेत काय?

» प्रियंका गांधींना नोटीस पाठवताना निवडणूक आयोगानं त्यांना आदर्श आचारसंहितेतील एका तरतुदीची आठवण करून दिली. ज्यामध्ये असं म्हटलं आहे की "पक्ष आणि उमेदवारांनी खाजगी जीवनातील पैलूंवर टीका करणं टाळावं" राजस्थानमध्ये निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतर त्याच क्षणापासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

---

# चक्रीवादळ 'हामून' बनले धोकादायक!

## » आज 5 राज्यांत अतिवृष्टीचा इशारा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बंगालच्या उपसागरात बांगलादेशजवळ सक्रिय असलेले चक्रीवादळ 'हामून' धोकादायक बनले आहे. त्याच्या प्रभावामुळे आज देशातील 5 राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर महाराष्ट्रात ऑक्टोबर हिटनंतर आता तापमानात हळूहळू घट होऊ लागली आहे. राज्यात अनेक ठिकाणी किमान तापमानात एक ते दोन अंश सेल्सिअसने घट होत असल्याचे दिसून येत आहे. तर लवकरच राज्यात थंडीची चाहूल लागण्याची चिन्हे आहेत.**



हवामान खात्याने चक्रीवादळ 'हमुन' बाबत ताजे अपडेट जारी केले आहे. पुढील 12 तासांत त्रिपुरा, नागालँड, मणिपूर, मेघालय आणि मिझोराममध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. हवामान खात्याने लोकांना वादळाबद्दल अपडेट राहण्यास तसेच शासनाच्या अधिकृत सल्ल्याचे पालन करण्यास सांगितले आहे. यासोबतच संबंधित राज्य सरकारांना वादळाच्या पार्श्वभूमीवर बचाव आणि मदतकार्यासाठी पथके तयार ठेवण्यास सांगण्यात आले आहे. खाजगी हवामान वेबसाईट स्कायमेटनुसार, तीव्र चक्रीवादळ 'हॅमून' आता उत्तर-पूर्वेकडे सरकले आहे. 25 ऑक्टोबर रोजी दुपारी या चक्रीवादळाने चितगावच्या दक्षिणेला बांगलादेश किनारा ओलांडला होता. त्याचा वाऱ्याचा वेग ताशी 75 ते 85 किमी दरम्यान राहील. सध्या हे वादळ कमकुवत होऊन खोल दबावात रूपांतरित झाले आहे. हे वादळ आज कमकुवत होऊ शकते, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्याच बरोबर आणखी एक समान चक्रीवादळ आंध्र प्रदेश किनारपट्टीपासून उत्तर पश्चिम बंगालच्या उपसागरावर समुद्रसपाटीपासून 1.5 ते 3.1 किमी उंचीवर असल्याचं देखील हवामान खात्याने म्हटलंय देशातील गेल्या 24 तासांच्या हवामानाबद्दल बोलायचे झाले, तर लक्षद्वीप, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, आसाम, मेघालय आणि नागालँडमध्ये हलका पाऊस झाला. या काळात केरळमध्ये हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला.

# जम्मू-काश्मीरमध्ये पाच दहशतवाद्यांना कंठस्नान!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

जम्मू आणि काश्मीरच्या उत्तर सीमावर्ती भागामध्ये भारतीय सैन्याच्या जवानांनी दहशतवाद्यांचा (TERRORISTS) डाव उधळून लावला. दरम्यान यावेळी भारतीय लष्कराने या कारवाईदरम्यान पाच दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात यश आलं आहे. जम्मू-कश्मीरच्या पोलिसांनी याबाबत माहिती दिली. कुपवाडा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जम्मू आणि काश्मीरमधील मच्छल सेक्टरमध्ये चकमक सुरू झाली, ज्यामध्ये आतापर्यंत दोन दहशतवादी मारले गेले आहेत. सध्या भारतीय लष्कराकडून शोध मोहीम सुरु आहे. सध्या यामध्ये मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांविषयी पोलीस अधिक चौकशी करत आहेत. सध्या इतर दहशतवाद्यांविरोधात शोध मोहीम सुरु असल्याची माहिती देण्यात आलीये. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कुपवाडा येथील नियंत्रण रेषेवरून दहशतवाद्यांचा एक गट घुसखोरीचा कट आखत असल्याची माहिती गुप्तचर यंत्रणेला आधीच मिळाली होती. या माहितीच्या आधारे देखरेख ठेवण्यात आली होती. गेल्या आठवडाभरात जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांच्या घुसखोरीची ही दुसरी घटना आहे. याआधी भारतीय लष्कराने उरीमध्ये घुसखोरीचा प्रयत्न केला होता. पण भारतीय लष्कराने दहशतवाद्यांचा हा डाव उधळून लावला.

# मलायका अरोराचा जबरदस्त परफॉर्मन्स!



अभिनेत्री मलायका आरोरा ही तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे नेहमीच चर्चेत असते. नुकताच एका पुरस्कार सोहळ्यात मलायकानं एक डान्स परफॉर्मन्स केला आहे. या पुरस्कार सोहळ्यातील मलायकाचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यामधील एका व्हिडीओची चर्चा सध्या सोशल मीडियावर होत आहे. या व्हिडीओमध्ये मलायका ही स्टेजवर लाडू वळताना दिसत आहे. तसेच ती "ऐका दाजीबा!" या गाण्यावर डान्स देखील करताना दिसत आहे. 'झी मराठी उत्सव नात्यांचा अवॉर्ड 2023' या पुरस्कार सोहळ्यात मलायकानं "ऐका दाजीबा!" या गाण्यावर परफॉर्म केलं आहे. तसेच तिनं या पुरस्कार सोहळ्यामध्ये लाडू देखील वळले. हा लाडू ती गायक सलील कुलकर्णीला देताना दिसत आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये दिसत आहे की, मलायका ही सलीलला लाडू देताना मराठी भाषेत बोलत आहे. ती म्हणते, "फक्त लाडू देणार, मी नाही येणारे" मलायकाचा "ऐका दाजीबा!" या गाण्यावर परफॉर्मन्स पाहण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत. हा संपूर्ण पुरस्कार सोहळा प्रेक्षक 4 नोव्हेंबर पाहू शकणार आहेत. 'छैय्या छैय्या', मुन्नी बदनाम हुई डार्लिंग तेरे लिए या गाण्यांमुळे मलायकाला विशेष लोकप्रियता मिळाली. मलायका ही विविध कार्यक्रमांचे परीक्षण देखील करत असते. मलायका ही तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे नेहमीच चर्चेत असते. मलायकाने 1998 मध्ये अरबाजसोबत लग्न केले. त्यानंतर 2017 मध्ये मलायका आणि अरबाजचा घटस्फोट झाला. सध्या मलायका अर्जुन कपूरला डेट करत आहे. अर्जुन आणि मलायका यांच्यामधील वयाच्या अंतरामुळे अनेक वेळा नेटकरी त्यांना ट्रोल करतात.

# अपूर्वाचा अंगावर शहारे आणणारा ट्रेलर!

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री तारा सुतारिया (TARA SUTARIA) ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. चित्रपट निर्माता करण जोहरच्या 'स्टुडंट ऑफ द इयर 2' या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण करणाऱ्या ताराने अल्पावधीतच प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. ताराचा 'अपूर्वा' (APURVA) हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. तिच्या या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. या ट्रेलरमधील ताराच्या अभिनयाचं सध्या अनेकजण कौतुक करत आहेत. तारा सुतारिया ही 'अपूर्वा' या थ्रिलर चित्रपटाद्वारे ओटीटी प्लॅटफॉर्मवर पदार्पण करणार आहे. 'अपूर्व' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीस आला आहे. DISNEY PLUS HOTSTAR या ओटीटी प्लॅटफॉर्मच्या YOUTUBE चॅनेलवर 'अपूर्व' चित्रपटाचा ट्रेलर शेअर करण्यात आला आहे.

ट्रेलरमध्ये दाखवण्यात आलं आहे की, अपूर्वा नावाच्या तरुणीचे लग्न सिद्धार्थ नावाच्या मुलाशी होणार आहे. अपूर्वा आणि सिद्धार्थ यांच्या लग्नाची तयारी सुरु असते अशातच काही गुंड अपूर्वाचे अपहरण करतात. या गुंडांच्या तावडीतून आपला जीव वाचवण्यासाठी अपूर्वा धडपड करते. 'अपूर्वा' या चित्रपटात तारा सुतारियासोबतच अभिषेक बॅनर्जी, राजपाल यादव आणि धैर्य करवा या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारली आहे. 'अपूर्वा' हा चित्रपट 15 नोव्हेंबर रोजी रिलीज होणार आहे. हा चित्रपट DISNEY PLUS HOTSTAR या ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज होणार आहे. काही दिवसांपूर्वी 'अपूर्वा' या चित्रपटाचा टीझर देखील रिलीज झाला होता. या टीझरला देखील नेटकऱ्यांची पसंती मिळाली होती. तारा सुतारियाचा गेल्या वर्षी 'एक व्हिलन रिटर्न्स' (EK VILLAIN RETURNS ) हा चित्रपट रिलीज झाला होता.जॉन अब्राहम (JOHN ABRAHAM), अर्जुन कपूर (ARJUN KAPOOR), आणि दिशा पाटनी (DISHA PATANI) यांनी देखील या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली होती. या चित्रपटानंतर तारा सुतारियाच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत होते. तारा सुतारिया ही सोशल मीडियावर देखील ॲक्टिव असते. इन्स्टाग्रामवर तिचे 8.8 मिलियन फॉलोवर्स आहेत.



# अयोध्येत पोहोचली कंगना रनौत

कंगना रनौत ही गुरुवारी (26 ऑक्टोबर) अयोध्येत (AYODHYA) पोहोचली. तिथे कंगनानं भगवान रामलल्लाचे दर्शन घेतले आणि पूजा देखील केली. कंगनातने अयोध्येत उभारण्यात येणाऱ्या भव्य राम मंदिराच्या (RAM MANDIR) बांधकामाची पहाणी देखील केली. कंगनानं अयोध्येतील तिचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. कंगनानं सोशल मीडियावर शेअर केलेल्या फोटोमध्ये कंगना ही श्रीरामाचे दर्शन घेताना दिसत आहे. या फोटोला कंगनानं कॅप्शन दिलं, "आओ मेरे राम! व्वा! माझ्यावर श्री हरी विष्णूंचा आशीर्वाद आहे, मी त्यांची भक्त आहे आणि आज मला त्यांचा इतका आशीर्वाद मिळाला आहे की, मला श्री हरी विष्णू परम पूजनीय अवतार, महान धनुर्धारी, अप्रतिम योद्धा, तपस्वी राजा, मरिदापुरुषोत्तम श्री राम यांची जन्मभूमी बघायला मिळाली. माझ्या तेजस या चित्रपटात रामजन्मभूमीची विशेष भूमिका आहे, त्यामुळे माझ्या मनात विचार आला की, मी रामलल्ला यांचे दर्शन घ्यावे,धन्य भाग मेरे राम, मेरे राम श्री रामाचे दर्शन घेतल्यानंतर कंगनानं पत्रकारांसोबत संवाद देखील साधला. यावेळी ती म्हणाली, 'रामलल्लाचे मंदिर बांधले जात आहे.



# लॉकडाऊनमध्ये कीर्तन शिकले

आचार्य अत्रे कट्टा येथे सध्या रंगभूमीवर चर्चेत असलेल्या 'जन्मवारी' या नाटकाचा प्रवास उलघडला बाहे. या नाटकाच्या टीमने कट्ट्यावर प्रेक्षकांशी मनमोकळा संवाध साधत या नाटकाची माहिती दिली. ठाण्यातील नौपाडा येथील जिजाऊ उद्यानात असलेल्या अत्रे कट्ट्यावर विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. नुकताच येथे रंगभूमीवर चर्चेत असलेल्या 'जन्मवारी' या नाटकाच्या टीमने गप्पा रंगल्या. या कार्यक्रमाच्या निमित्ताने एक मनमोकळा सुसंवाद साधण्यासाठी या कट्ट्यावर स्वतः लेखिका-दिग्दर्शिका हर्षदा बोरकर, संगीतकार मंदार देशपांडे आणि अभिनेत्री कविता जोशी, अमृता मोडक आणि शर्वरी कुळकर्णी-बोरकर उपस्थित होते.

# भरत जाधव यांचा 'लंडन मिसळ' चित्रपट

जालिंदर कुंभार दिग्दर्शित 'लंडन मिसळ' (LONDON MISAL) हा चित्रपट येत्या 8 डिसेंबरला प्रदर्शनासाठी सज्ज झाला आहे. भारतात तसेच लंडनमध्ये शूट झालेल्या या चित्रपटाच्या माध्यमातून बऱ्याच वर्षांनी अभिनेता भरत जाधव (BHARAT JADHAV) हा महत्त्वपूर्ण भूमिकेत पडद्यावर प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसणार आहेत. आपल्या भूमिकेतून प्रेक्षकांना सरप्राईज देणाऱ्या भरत जाधवनं पहिल्यांदाच चित्रपटासाठी रॅप गायन देखील केलं आहे. श्री. रवींद्रनाथ टागोर यांच्या एका नाटकावरून 'लंडन मिसळ' हा चित्रपट प्रेरित आहे, हे या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. 'लंडन मिसळ' या चित्रपटात ऋतुजा बागवे, रितिका श्रोत्री, माधुरी पवार, गौरव मोरे, निखील चव्हाण, ऋतुराज शिंदे आणि सुनील गोडबोले हे कलाकार प्रमुख भूमिकेत आहेत तर भरत जाधव एका हटके भूमिकेत प्रेक्षकांचं निखळ मनोरंजन करताना दिसणार आहेत आणि ही प्रेक्षकांसाठी मोठी मेजवानी असेल. आदिती आणि रावी या लंडनमध्ये राहणाऱ्या दोन सख्ख्या बहिणींची कथा 'लंडन मिसळ' या चित्रपटामध्ये दाखवण्यात येणार आहे. गौरव मोरे यांनी 'लंडन मिसळ' या चित्रपटाचं पोस्ट सोशल मीडियावर शेअर करुन कॅप्शनमध्ये लिहिलं, 'तिखट तर्री घालून 440 व्होल्टचा झटका द्यायला येत आहे. 'लंडन मिसळ' फॅमिली मनोरंजनाची झणझणीत मेजवानी! 8 डिसेंबर पासून तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात' 'लंडन मिसळ' हा चित्रपट 8 डिसेंबर रोजी रिलीज होणार आहे. 'लंडन मिसळ' या चित्रपटाचे निर्माते अमित बसनेट, सुरेश गोविंदराय पै आणि आरोन बसनेट आहेत तर सह-निर्माते सानिस खाकुरेल आहेत.

# श्रीलंकेने इंग्लंडला लोळवले!

## » इंग्लंड सेमीफायनलच्या शर्यतीतून बाहेर!

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**एकदिवसीय विश्वचषकाच्या 25 व्या सामन्यात श्रीलंकेने इंग्लंडचा 8 गडी राखून पराभव केला. प्रथम श्रीलंकेच्या गोलंदाजांनी चमकदार कामगिरी करत इंग्लंडला स्वस्तात बाद केले आणि त्यानंतर केवळ दोन गडी गमावून लक्ष्य गाठले. टॉस गमावल्यानंतर लंकन संघाने पहिला गोलंदाजी केली आणि आपल्या भेदक मा-याने इंग्लिश संघाला अवघ्या 156 गुंडाळले.**



त्यानंतर पथुम निसांका (नाबाद 77) आणि सदीरा समरविक्रमा (नाबाद 65) यांच्या अर्धशतकाच्या जोरावर 25.4 षटकात 160 धावा करून श्रीलंकेने विजयावर शिक्कामोर्तब केला. समरविक्रमा आणि निसांका यांच्यात तिसऱ्या विकेटसाठी 137 धावांची विजयी भागीदारी झाली. बंगळूरच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेला इंग्लंडचा संघ 33.2 षटकांत सर्वबाद झाला. संघाकडून बेन स्टोक्सने सर्वाधिक 43 धावा केल्या, तर सलामीवीर जॉन बेअरस्टोने 30 धावांचे योगदान दिले. डेव्हिड मलानने 28 धावा केल्या. श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज लाहिरू कुमारने 3 तर कसून रजिथा आणि अँजेलो मॅथ्यूजने प्रत्येकी 2 बळी घेतले. इंग्लंडने पॉवरप्लेमध्ये धिम्यागतीने सुरुवात केली. यादरम्यान मलानच्या रुपात पहिला धक्का बसला. ज्यातून इंग्लिश संघ सावरला नाही. श्रीलंकेच्या वेगवान गोलंदाजांसमोर इंग्लिश फलंदाजांनी एकापाठोपाठ एक करत लोटांगण घातले. आणि विकेट गमावल्या. यादरम्यान श्रीलंकेच्या क्षेत्ररक्षकांनी काही चांगले झेल घेतले, तर इंग्लिश फलंदाज खराब फटके खेळून बाद झाले. स्टोक्सने 43 धावांची उपयुक्त खेळी केली. पण त्याला मोठ्या डावात त्याचे रुपांतर करता आले नाही. श्रीलंकेच्या संघाने सामन्याच्या पहिल्या षटकापासूनच भेदक मारा केला. त्यांची गोलंदाजी इंग्लिश फलंदाजांना समजू शकली नाही. या विश्वचषकात पहिला सामना खेळणाऱ्या मॅथ्यूजने 2 बळी घेतले. त्याने 3 वर्षांनी एकदिवसीय क्रिकेटमध्ये गोलंदाजी केली. कसून रजिथा, लाहिरू, दिलशान मदुशंका आणि महेश तिक्षाना हे तिघेही या सामन्यात शानदार गोलंदाजी करताना दिसले. एक गोलंदाज फलंदाजांवर दबाव टाकत होता आणि दुसरा गोलंदाज विकेट घेत होता. गोलंदाजांनी धावा न देऊन फलंदाजांवर दबाव आणला. रजिताने 7 षटकांत 36 धावा दिल्या आणि महेशने 8.2 षटकांत केवळ 21 धावा दिल्या. मॅथ्यूजने 5 षटकांत 14 धावा दिल्या तर लाहिरूने 7 षटकांत केवळ 35 धावा दिल्या. श्रीलंकेविरुद्ध इंग्लंडने धिम्यागतीने सुरुवात केली. डेव्हिड मलान जॉनी बेअरस्टोसोबत फलंदाजीसाठी उतरला होता. श्रीलंकेसाठी दिलशान मदुशंकाने गोलंदाजीची सुरुवात केली. बेअरस्टो पहिल्याच षटकात बाद होण्यापासून थोडक्यात बचावला. सामन्यातील पहिला चेंडू बेअरस्टोच्या पॅडवर आदळला. श्रीलंकेच्या संघाने जोरदार अपील केले. पण पंचांनी हे अपील नाकारले. पण लंकन खेळाडूनी रिव्ह्यू घेतला नाही. पण रिप्लेमध्ये हे स्पष्ट दिसत होते की, रिव्ह्यू घेतला असता तर बेअरस्टो बाद झाला असता. चेंडू थेट विकेटवर आदळत होता. श्रीलंकेच्या खेळाडूंनी चुका केल्या आणि पहिल्याच षटकात त्यांना विकेट घेता आली नाही. इंग्लंडची धावसंख्या दोन षटकांत बिनबाद सात धावा होती. बेअरस्टोने सात धावा केल्या. डेव्हिड मलानला खाते उघडता आले नव्हते. श्रीलंकेचा अनुभवी अष्टपैलू अँजेलो मॅथ्यूजने इंग्लंडविरुद्ध संघाला पहिले यश मिळवून दिले.

### इंगिश फलंदाजांचा सुमार खेळ

» इंग्लंडचा अनुभवी फलंदाज जो रूट धावबाद झाला. 10व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर त्याला एक धाव घ्यायची होती. रुट त्याच्या क्रीजच्या पुढे गेला होता. नॉन स्ट्रायकरवर उभ्या असलेला जॉनी बेअरस्टो काही पावले पुढे आला, पण तो थांबला. त्याने रूटला माघारी परतण्याचा कॉल दिला. मात्र, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. रुटने 10 चेंडूत तीन धावा केल्या. यावेळी इंग्लंडची धावसंख्या 10 षटकांत 2 बाद 59 होती. राजिताने इंग्लंडला तिसरा धक्का दिला. त्याने 14व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर जॉनी बेअरस्टोला बाद केले. बेअरस्टो 31 चेंडूत 30 धावा करून धनंजय डी सिल्वाकरवी झेलबाद झाला.

# कनेरियाचा आफ्रिदीवर खळबळजनक आरोप!

## » इंझमाम आणि अख्तर यांनी खूप दिली साथ

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पाकिस्तानचा माजी फिरकीपटू दानिष कनेरिया याने पाकचा माजी कर्णधार आणि इतर खेळाडूंवर खळबळजनक आरोप केले आहेत. एका वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी पाकिस्तानमध्ये हिंदूंना किती संघर्ष करावा लागतो? याबाबत भाष्य केले आहे. शाहिद आफ्रिदीने माझ्यावर धर्मपरिवर्तन करण्यासाठी दबाव टाकला. त्याचा माझा करियरवर मोठा परिणाम झाला, असे दानिष कनेरिया म्हणाला आहे.**



दानिष पुढे बोलताना म्हणाला, "भारतातही खेळाडू पूजा करतात, विराट कोहली-रोहित शर्माही पूजा करतात. मोहम्मद शमी आणि मोहम्मद सिराजही नमाज अदा करू शकतात, पण ते कधीही मैदानावर कधीही नमाज अदा करताना दिसले नाहीत. पाकिस्तानमध्ये जे काही सुरु आहे, त्याच्या विरोधात मी आवाज उठवीन.

मी सनातनी आहे आणि हिंदू समाजासाठी आवाज उठवणार आहे. भारतातील प्रत्येक व्यक्ती आणि प्रसारमाध्यमांनी यावर आवाज उठवावा अशी माझी इच्छा आहे. "देवाच्या कृपेने माझे करिअर चांगले चालले होते. इंझमाम उल-हक आणि शोएब अख्तर यांनी मला खूप सपोर्ट केला आहे. मात्र, शाहिद आफ्रिदीने मला खूप त्रास दिला. त्याने माझ्यासोबत जेवण केले नाही. इतकेच नाही तर त्यांनी धर्म बदलण्याबाबतही बोलले. माझा धर्मच माझ्यासाठी सर्वस्व आहे." असेही दानिष यावेळी बोलताना म्हणाला.

दानिष कनेरिया पाकिस्तानी क्रिकेट संघासाठी २००० ते २०१० या दरम्यान खेळला. लेग स्पिनर असलेला दानिष कनेरिया वसीम आक्रमनंतर दुसरा सर्वात जास्त विकेट्स पटकावणारा गोलंदाज ठरला होता. दानिष कनेरिया हा हिंदू आहे. त्याचा जन्म पाकिस्तानच्या कराचीमध्ये झाला. कनेरियाने पाकिस्तानकडून ६० पेक्षा जास्त कसोटी सामने आणि २० एकदिवसीय सामने खेळले आहेत.

# सिराजला दिली जाऊ शकते विश्रांती?

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

भारतीय संघ रविवारी (२९ ऑक्टोबर) विश्वचषकातील त्यांच्या सहाव्या सामन्यात इंग्लंडशी दोन हात करणार आहे. लखनऊ येथील भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी एकाना स्टेडियमवर दोन्ही संघांमधील हा सामना खेळवला जाणार आहे. टीम इंडियाचा आपली विजयी मोहीम सुरू ठेवण्याचा मानस असणार आहे. ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विनला लखनऊमध्ये खेळण्याची संधी मिळू शकते. स्टार अष्टपैलू हार्दिक पांड्या घोट्याच्या दुखापतीतून सावरला नसल्याने तो न्यूझीलंड विरुद्धचा सामना खेळू शकला नाही. त्यामुळे तो इंग्लंडविरुद्ध खेळेल की नाही याबाबत साशंकता आहे. त्यानंतर २ नोव्हेंबरला मुंबईत भारताचा श्रीलंकेशी सामना होईल. त्याच वेळी, ५ नोव्हेंबरला टीम इंडिया कोलकातामध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळणार आहे. इंग्लंडशिवाय पांड्या या दोन सामन्यांतही कदाचित खेळू शकणार नाही.

१९ ऑक्टोबरला पुण्यात बांगलादेशविरुद्ध गोलंदाजी करताना हार्दिक चेंडू अडवताना घसरला आणि त्याचा पाय मुरगळला, त्यामुळे तो २२ ऑक्टोबरला धरमशाला येथे न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्याला मुकला. त्याने दुखापतीवर उपचार घेण्यासाठी सोमवारी बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत (एनसीए) पोहचला होता. लखनऊमध्ये हा विश्वचषकातील चौथा सामना असेल. आतापर्यंत येथे तीन सामने खेळले गेले आहेत. लक्ष्याचा पाठलाग करणारा संघ तीनपैकी दोन सामने जिंकला आहे.